मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 19 ऑगस्ट 2025 | पान- 1

# पवना धरण क्षेत्रात पावसाचा जोर सुरुच

## नदीच्या जलपातळीत वाढ झाली असून नागरिकांनी सावध रहावे; धरण पूरनियंत्रण कक्षाकडून सुचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना धरण क्षेत्रात पावसाचा जोर सुरुच असल्याने. अशात आज सोमवार (दि.१८ऑगस्ट) रोजी पवना धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. आज दि.१८ दुपारी २ वाजता एकुण ८०० क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग पवनानदी पात्रात करण्यात आला आहे. त्यामुळे पवना नदीच्या जलपातळीत वाढ झाली असून नागरिकांनी सावध रहावे, अशी सुचना पवना धरण पूरनियंत्रण कक्षाकडून देण्यात आली आहे.

पवना नदी काठच्या सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत आहे की, पवना धरण गुरुवार दि.१८ ऑगस्ट रोजी दुपारी १ च्या आकडेवारी नुसार ९७.४५ टक्के क्षमतेने भरलेले आहे. धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर लक्षात घेता विज निर्मिती ग्रहद्वारे पवना नदीमध्ये ८०० क्यूसेक्स विसर्ग करण्यात आला आहे. धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण पाहता आणि आवकानुसार पवना धरणाच्या सांडव्यावरून विसर्ग पवनानदी पात्रात करण्यात येईल. तरी पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, कृपया नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलवण्यात यावेत. सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात व सर्वांनी



योग्य ती दक्षता घ्यावी व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे. पावसाचा जोर कमी जास्त झाल्यास बदल केला जाईल.अशी माहिती पवनाधरण विभागाकडून देण्यात आली आहे.

# गोविंदा आला रे... आला गोविंदा... आला..

## चिखली परिसरात निलेशदादा नेवाळे सोशल फाऊंडेशनतर्फे दहीहंडी उत्साहात

**पिंपरी | प्रतिनिधी**

मच गया शोर सारी नगरी मे... 'गोविंदा आला रे आला... आला गोविंदा... गोंविदा रे गोपाळा... यशोदेच्या तान्ह्या बाळा... एक दोन तीन चार... चिखलीची पोरं हुश्शार...' अशा एकाहून एक गाण्यांच्या तालावर थिरकत आणि डीजेच्या तालावर नाचत मोठ्या उत्साहात शनिवार दुपारपासून रात्री उशिरापर्यंत दहीकाला अर्थात दहीहंडी उत्सव चिखली परिसरात निलेशदादा नेवाळे सोशल फाऊंडेशनतर्फे उत्साहात साजरा करण्यात आला.

चिखली घरकुल येथे शनिवारी (दि.१६) रोजी दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तर रविवारी (दि.१७) रोजी शनि मंदीर ग्राऊंड पूर्णानगर येथे दहीहंडी उत्सावाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे दहीहंडी उत्सवाच्या दिवसभर पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. त्यामुळे बालगोपाळांचा आनंद आणखीनच द्विगुणीत झाला.

दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मराठी सिने अभिनेत्री उर्मिला कानिटकर, रितुजा शिंदे या होत्या. दहीहंडी उत्सावातील गोविंदाना शुभेच्छा देण्यासाठी भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्यासह प्रभाग क्रमांक ११ मधील आजी-माजी नगरसेवक उपस्थित होते. दहीहंडी उत्सवासाठी चेंहूरचे



साईसिध्दी गोविंदा पथक, ठाण्याचे जय गणेश गोविंदा पथक यांच्या हस्ते दोन्ही ठिकाणी दहीहंडी फोडण्यात आली. फुलांची उधळण, विदुयत रोषणाई, दहीहंडी पाहण्यासाठीची अलोट गर्दी, गोविंदाने दहीहंडी फोडण्यासाठी रचलेले थर पाहून नागरिकांनी जल्लोष केला.

आमदार महेश लांडगे म्हणाले, निलेशदादा नेवाळे सोशल फाऊंडेशनतर्फे आयोजित दहीहंडी उत्सव म्हणजे धार्मिक अन् आपली संस्कृती जपण्याचे काम आहे. कृष्ण जन्माष्टमीला साजरा केला जाणारा एक लोकप्रिय सांस्कृतिक खेळ म्हणजे दहीहंडी. दहीहंडीचा उत्सव पाहण्यासाठी चिखली घरकुल, पूर्णानगर परिसरातील अबालवृध्दांची अलोट गर्दी पाहून मन भारावले. निलेशदादा तुमचे काम समाजासाठी चांगले असून, असाच वारसा पुढे सुरु ठेवा. पुढील कार्यास माझी साथ आणि शुभेच्छा कायम आहेत.

निलेश नेवाळे म्हणाले, आपली संस्कृती, सणोत्सवाचे महत्व पुढच्या पिढीला कळले पाहिजे. त्यासाठी असे उत्सव होणे आवश्यक आहेत. त्यासाठीच माझ्या परिसरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन हा दहीहंडी उत्सव साजरा केला. गोविंदाना प्रोत्साहन देण्यासाठी मराठी सिनेअभिनेत्री यांची उपस्थिती



सर्वांचे आकर्षण ठरले. दरवर्षी आपण धार्मिक, सांसिकृतिक उपक्रम मोठ्या उत्साहाने घेतो आणि यापुढेही घेत राहणार असल्याची भावना व्यक्त केली.

# हिंजवडीतील चौकांनी घेतला मोकळा श्वास

## तीन रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवली; ‘पीएमआरडीए’चा पुढाकार, दहा रस्त्यांचे सर्व्हेक्षण सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी हबमधील रस्ते अतिक्रमण, वाहतूक कोंडीने ग्रासले होते. परिणामी आयटीयन्सना तासन्तास कोंडीत अडकून पडावे लागत होते. दरम्यान, गेल्या दीड महिन्यात प्रमुख तीन चौकालगतची अतिक्रमणे हटवल्यानंतर या चौकांनी मोकळा श्वास घेतला आहे. या चौकालगतची जवळपास बाराशेहून अधिक अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली आहेत; तसेच दहा रस्त्यांचे सर्व्हेक्षण सुरू आहे.



आयटी पार्कमधील नागरी समस्या, वाहतूक कोंडी यामुळे येथील कंपन्या त्रासल्या होत्या. नवीन कंपन्यांनी निराशा व्यक्त केली होती. तर, कंपन्यांनी स्थलांतर करण्याचा विचार सुरू होता. याची दखल घेत खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी हिंजवडीत दोनवेळा समस्यांचा आढावा घेतला. या वेळी पीएमआरडीए, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ यासह स्थानिक ग्रामपंचायत यांनादेखील सूचना केल्या होत्या. तसेच, सिंगल पॉईंट ऑथरिटीचे तयार करण्यात आली असून, पुणे विभागाचे विभागीय आयुक्त हे अध्यक्ष आहेत. त्यानुसार सर्वच विभाग कामाला लागेल होते.

दरम्यान, हिंजवडीचा सर्वाधिक परिसर हा एमआयडीसी अंतर्गत येतो. तर, या ठिकाणी पीएमआरडीएच्या वतीने मेट्रो आणि रस्त्याचे जाळे उभारण्यात येणार होते. याच धर्तीवर पीएमआरडीएला सिंगल पॉईंट को ऑर्डिनेटर म्हणून नेमण्यात आले होते. पुढे येथील सहा रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

> हिंजवडी, मारुंजी परिसरात रस्ते प्रस्तावित आहेत. त्या अनुषंगाने सर्व्हेक्षण, सुनावणी कारवाई सुरु आहे. या ठिकाणी रस्त्यावर अडथळे येणारे व कोंडीच्या कारणांची पाहणी करण्यात आली होती. त्यानुसार अतिक्रमणे हटविण्याची कारवाई करण्यात आली आहे. यामुळे चौकातील वाहतूक कोंडी कमी झाली आहे.
>
> **- डॉ. दीप्ती सूर्यवंशी पाटील, सहआयुक्त, पीएमआरडीए.**

दरम्यान, रस्तारुंदीकरण, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि बेशिस्त वाहनांना आळा बसावा यासाठी स्थानिक पोलिसांच्या मदतीने तब्बल दहा रस्त्यावर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली होती. त्यातील सर्वाधिक रस्ते हे आयटी हबमधील असल्याने सलग दीड महिने ही कारवाई सुरु होती. यात सर्वाधिक लक्ष्मी चौक ते मारुंजी या दरम्यान अतिक्रमणे आणि कच्ची, पक्की अशी 310 बांधकामे हटविण्यात आली आहेत.

आयटी हबमधील होणारी कोंडी, आयटीयन्सना होणारा त्रास लक्षात घेता प्रत्येक चौकातील अडथळे, कोंडी याचे विश्लेषण करण्यात आले होते. तसेच, काही नेमक्या बाबी प्रशासनास निदर्शनास आणून दिल्या होत्या. दरम्यान, यापैकी अनेक अडथळे प्रशासनाने दूर केले आहेत. त्यापैकी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एमाअयडीसी शेड, मधुबन हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज शिवाजी चौक आणि पाईड रोड ते विप्रो सर्कल या चौकांचा समावेश आहे.

# जाधववाडीतील पदपथांवर अतिक्रमण; नागरिकांनी चालायचे कुठे?

## दुकानातील वस्तू विक्रीसाठी पदपथावर ठेवल्या जात असून, पालिका प्रशासनाचे लक्ष राहिलेले नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुजोर फेरीवाले, दुकानदार, रस्ते, पदपथ अडवून बिनदिक्कतपणे व्यवसाय करत असले तरी फेरीवाल्यांबरोबर , गॅरेज आणि इतरही अस्थापनांकडून पदपथांवर अतिक्रमण करण्यात येत असल्याचे दिसून येते. दुकानातील वस्तू विक्रीसाठी पदपथावर ठेवल्या जात असून, या लोकांना पालिका प्रशासनाचे लक्ष राहिलेले नाही. जाधववाडीमध्ये सावतामाळी मंदीर ते मातोश्री कमान या दरम्यान फुटपाथावर दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. फुटपाथावर विट, वाळू, खडी, वाहने असल्याने नागरिकांनी चालायचे कुठे अन् कसे असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

जाधववाडीतील सावतामाळी मंदीर ते मातोश्री कमानपर्यंत पदपथांवर अतिक्रमण केले आहे. दुकानदारांनी सिमेंट विटा, लाल विटा, वाळू, खडी हे फुटपाथावर टाकले आहे. बाजूला लागून कॉमन स्वच्छतागृह असून नागरिकांनी ये-जा कशी करायची. त्या ठिकाणी हा सर्व राडारोडा टाकल्याचे चित्र आहे. महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.




> आम्ही कारवाई करतो, दोन तीन दिवस गेले की, लगेच जैसे थे अतिक्रमण केले जाते. आम्ही एका ठिकाणी थांबू शकत नाही. पुन्हा अतिक्रमण विभागाच्या टीमला बोलून अतिक्रमण कारवाई करण्यास सांगितले जाईल.
>
> **- सुभाष कुंभार, अतिक्रमण निरिक्षक.**

> पदपथ हे नागरिकांना चालण्यासाठी असतात. मात्र जाधववाडी ते सावतामाळी मंदीर दरम्यान काही दुकानदारांनी पदपथांवर अतिक्रमण केले आहे. नागरिकांना ये-जा करण्यासाठी अडथळा निर्माण होतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने लक्ष घालून अतिक्रमण काढणे आवश्यक आहे.
>
> **- विशाल आहेर, ग्रामस्थ.**

# पुणे महापालिकेचा हरित उपक्रम यशस्वी

## तब्बल 11,620 रोपांची लागवड करून 'हरित पुणे' मोहिमेला गती; 13 ठिकाणी लागवड

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारने दिलेल्या साडेदहा हजार रोपांची लागवड करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने पूर्ण करत तब्बल साडेअकरा हजारांहून अधिक रोपांची लागवड केली. शहराच्या वेगवेगळ्या भागांत १३ ठिकाणी ही लागवड केली आहे.

राज्य सरकारने 'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत महापालिकेस १० हजार १०० रोपे सप्टेंबर अखेरपर्यंत लावण्याचे उद्दिष्ट दिले होते. त्यानुसार, महापालिकेच्या पथ विभागाकडून वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतला होता.

कदंब, कडुनिंब, मोहगणी, बकुळ, ताम्हण, कांचन, जांभूळ, सोनचाफा, बहावा, वड, पिंपळ, करंज, चाफा, आंबा, चिंच, सीताअशोक, अर्जुन अशी विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. धानोरी येथील बॉम्बे सॅपर्स (३५०० झाडे), विमाननगर येथील अग्निबाझ शाखा (३०००), घोरपडी येथील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील आरडब्ल्यूए कार्यालय (१०००).




बी. टी. कवडे रस्ता, पासपोर्ट ऑफिस रोड, नॉर्थ मेन रोड (प्रत्येकी १०० रोप), मंगलदास रोड, बोट क्लब रोड (प्रत्येकी २५०), बंडगार्डन रस्ता (३००), अंडी उबवणी केंद्र ते खडकी रेल्वे स्थानक (४८०), बालेवाडी येथील राधा चौक ते गणराज चौक (५००), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंद ऋषीजी चौक ते पाषाण सर्कल रस्ता (५१०), औंध रोड विद्यापीठ चौक ते ब्रेमेन चौक (१५३०) अशा वेगवेगळ्या ठिकाणी एकूण ११ हजार ६२० इतक्या रोपांची लागवड करण्यात आली.

# गणेशोत्सवाआधी पुणे पोलिस व प्रदूषण मंडळाला दणका

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला 1 हजारपैकी 928.43 गुण; कोलकाता विद्यापीठाला 928.49 गुण

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या वर्षी पुण्यातील गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन गणेश मंडळांकडून झाले होते. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) पुणे पोलीस आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिले आहेत.

गेल्या वर्षी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने गणेशोत्सवाच्या काळातील ध्वनिप्रदूषणाची पातळी तपासण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलिसांना दिले होते. शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गणेशोत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या होत्या. त्यात बहुतांश गणेश मंडळांनी ध्वनिप्रदूषणाच्या पातळीचे उल्लंघन केल्याचे समोर आले होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलिसांकडून ध्वनिप्रदूषणाच्या पातळीचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळांची यादी गणेशोत्सवानंतर जाहीर करणे अपेक्षित होते. मात्र, अशी यादी जाहीर करण्यात आली नाही.



या प्रकरणी डॉ. कल्याणी मांडके यांनी न्यायाधिकरणाकडे याचिका दाखल केली आहे. न्यायाधिकरणाने गेल्या वर्षी ३० ऑगस्टला गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाबाबत दिलेल्या निर्देशांचे पालन पुणे पोलीस आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केले नाही, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायाधिकरणाने पुणे पोलीस आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला नोटीस बजावली. गेल्या वर्षी गणेशोत्सवादरम्यान झालेल्या ध्वनिप्रदूषण प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती सादर करण्याचे निर्देश न्यायाधिकरणाने पोलिसांसह प्रदूषण मंडळाला दिले आहेत. या प्रकरणी पुढील सुनावणी २२ ऑगस्टला होणार आहे.

### आवाजाची पातळी 70 ते 85 डेसिबल

» महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी गेल्या वर्षी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजण्यात आली. त्या शहरातील मध्यवर्ती भागातील मंडळांसह उपनगरांतील मंडळांचा समावेश होता. गणेशोत्सवात ७ ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली गेली. यात आवाजाची पातळी ७० ते ८५ डेसिबलपर्यंत नोंदविण्यात आली. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण झाल्याची बाब निदर्शनास आली होती. यात गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दिवसाच्या ध्वनिप्रदूषणाची नोंद घेण्यात आली नव्हती.

### पार्श्वभूमी काय?

» गेल्या वर्षी प्रथमच गणेशोत्सवादरम्यान होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाची पातळी गणेश मंडळांच्या ठिकाणी तपासण्यात आली. सुमारे दोनशे मंडळांच्या ठिकाणी ही पातळी तपासण्यात आली. मात्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ध्वनिप्रदूषण करणाऱ्या गणेश मंडळाची यादी जाहीर केली नाही. याचबरोबर या मंडळांवर केलेल्या कायदेशीर कारवाईचा कोणताही तपशील प्रदूषण मंडळ आणि पोलिसांनी जाहीर केलेला नाही.

# सातबाऱ्यावरील 'प्रकल्पग्रस्त' शिक्क्याचे शल्य!

## पुरंदर विमानतळामुळे विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटतेय

**पुणे | प्रतिनिधी**

'अंजीर आणि पेरूच्या बागा उद्ध्वस्त होतील, सुपीक शेतजमीन बाधित होईल,' असे म्हणणे मांडून प्रस्तावित पुरंदर विमानतळाला काही शेतकरी विरोध करत आहेत, तर जमिनीच्या सातबाऱ्यावर 'प्रकल्पग्रस्त' या शिक्क्यामुळे तरुणांचे विवाह मोडल्याचे प्रकार घडल्याचा काहींचा दावा आहे. त्याचबरोबर विमानतळाची घोषणा आणि आराखडे ही चर्चा दशकभरापासून सुरू असल्याने अनिश्चितता, मोबदला मिळाल्यावर होणारे कौटुंबिक कलह असे अनेक मुद्देही पुढे आले आहेत. नवे प्रकल्प उभे राहत असताना घडत असलेल्या आर्थिक-सामाजिक बदलांचे चित्रच यानिमित्ताने पाहायला मिळत आहे.

'सातबाऱ्यावर 'प्रकल्पग्रस्त' असा शिक्का बसला म्हणून माझ्या लग्नाला नकार मिळाला,' असा अनुभव पारगाव मेमाणे येथील सागर मेमाणे सांगतात. 'शिक्षण किंवा व्यवसायात फारशी मजल मारता आली नाही. शेती होती, म्हणून तीच आधार होती; पण आता शेतीही जाणार, मोबदला कधी मिळणार याची शाश्वती नाही. या अस्थिरतेमुळे आमच्या भविष्यावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे,' अशा शब्दांत सागर यांनी व्यथा सांगितली.

'प्रकल्पातील सात गावांपैकी पारगाव मेमाणे येथे ८० तरुणांनी वयाची पस्तिशी पार केली, तरी त्यांचे विवाह ठरलेले नाहीत. कुंभारवळणमध्ये ५० पेक्षा अधिक तरुणांनी चाळिशी ओलांडली आहे. वनपुरीमध्ये ४५ युवक अजूनही अविवाहित आहेत. त्यामुळे सुमारे २२५ तरुणांच्या संसाराला अद्याप मुहूर्त लागलेला नाही. केवळ लग्नच नाही, तर घर बांधायचे, व्यवसाय उभारायचा, कर्ज घ्यायचे, शेतात विहीर घ्यायची किंवा नाही असे रोजच्या जगण्यातील निर्णयही प्रकल्पाच्या घोषणेत अडकून पडले आहेत.

सत्तांतर, जागाबदल, विरोधक-समर्थक यांच्या राजकीय खेळ्या आणि अधिसूचनांच्या गोंधळात गावकऱ्यांचे सामाजिक जीवन विस्कळीत झाले आहे. खस्ता खात आयुष्य जगणाऱ्या वृद्धांना स्वतःच्या जमिनीवरून विस्थापित होण्याची भीती आहे. आधी शेती तरी होती, आता तीही नसेल. मग आम्ही मुलींच्या घरच्यांना काय सांगायचे? घरदार आहे, की फक्त नकाशावर एक नाव, असे प्रश्न तरुणांच्या पालकांसमोर आहेत,' याकडे प्रकल्पग्रस्त दत्तात्रय मेमाणे लक्ष वेधतात.

'काळ्या मातीवर खस्ता खाल्ल्या; पण पीकही सोन्यासारखे घेतले. तीच जमीन आमच्या हातून जाईल, याचे दुःख जास्त आहे,' असे शेतकरी विठ्ठल हगवणे कातर स्वरात व्यक्त होतात. 'नवउद्योजक म्हणून दहा वर्षांपूर्वी व्यवसायात उतरलो. मात्र, पुरंदर विमानतळासाठी जागा जाणार असल्याने समस्या वाढल्या आहेत. जमिनीचा मोबदला मिळेल. परंतु, पुन्हा दुसऱ्या ठिकाणी जाऊन नव्याने व्यवसाय सुरू करणे जिकिरीचे होईल,' असे मुंजवडी येथील एका गोट फार्मिंग आणि पोल्ट्री व्यावसायिकाने सांगितले.

'अनेक ठिकाणच्या धरण प्रकल्पांतील बाधितांच्या दोन-तीन पिढ्या पुनर्वसनासाठी उंबरठे झिजवत आहेत, हे गावकरी जाणून आहेत. सातबाऱ्यावर 'प्रकल्पग्रस्त' असा शिक्का बसल्यावर मुलाचे लग्न मोडले, शेतीला कर्ज मिळत नाही, व्यवहार होत नाही. सरकारने या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना केवळ तांत्रिक, आर्थिक मुद्द्यांकडे न पाहता, गावकऱ्यांच्या भावनांचा, आर्थिक, कौटुंबिक भवितव्याचा विचार करूनच पुढचे पाऊल उचलावे,' असे राजाभाऊ कुंभारकर आणि गावकरी सांगतात.



### 'नातेसंबंधही तुटत चालले'

» 'केवळ आमची धरणी मायच नाही, तर नातेसंबंधही तुटू लागले आहेत. भावा-बहिणींमध्ये, चुलत्या-पुतण्यात, लेक-जावई या नात्यांमध्ये फूट पडत आहे. उद्या जास्त पटींनी मोबदला वाढवून मिळेलही, तरी वेळ निघून गेल्यावर पैशाचे करायचे काय, हा विचार अनेक वृद्धांना भेडसावतो आहे. शेती, वारसा, नातेवाईक यांचा आयुष्यभर गोफ गुंफलेल्या वृद्धाला पैशाच्या प्रलोभनाची कुठलीही आवश्यकता नाही,' असे ज्ञानेश्वर मेमाणे सांगतात.

### 'शिवशाहीचा वारसा नष्ट होणार'

» 'छत्रपती शिवाजी महाराज परगणा जाताना जुन्नर, खेड शिवापूर, सुपे या मार्गाने पारगाव मेमाणे येथे मुक्कामी असायचे. ग्रामदैवत भैरवनाथ मंदिराच्या मोकळ्या जागेत त्यांच्या घोडदळाचा विसावा असायचा. हा वारसा, गावची विशेष ओळख पुसली जाणार,' अशी चिंता इतिहास संशोधक राज मेमाणे यांनी व्यक्त केली.

# ब्रिटिशकालीन भाटघर धरण 100 टक्के भरले

## नदीकाठच्या नागरिकांना सावधानतेचा इशारा; वेळवंडी नदीपात्रात 3050 क्युसेक विसर्ग

**पुणे | प्रतिनिधी**

भाटघर धरण (येसांजी कंक जलाशय) रविवारी (दि. 17) दुपारी दीडच्या सुमारास 100 टक्के भरले. वीजनिर्मिती केंद्र व 45 स्वयंचलित दरवाजातून वेळवंडी नदीपात्रात 3 हजार 50 क्युसेकने विसर्ग सोडल्याने पूर्व भागातील नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे, असे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी सांगितले. मागील वर्षाच्या तुलनेने धरण यंदा 15 दिवस उशिरा भरले.

धरण क्षेत्रातील सततच्या पावसामुळे जुलैअखेर वीजनिर्मिती केंद्रातून, स्वयंचलित दरवाजातून विसर्ग सोडण्यात आला होता.

तालुक्याच्या पश्चिम भागात गेल्या दोन दिवसांपासून सतत रिमझिम पाऊस पडत आहे. विशेषतः भुतोंडे, मळे, पांगारी खोऱ्यात होत असलेल्या पावसाने धरणाच्या साठ्यात झपाट्याने वाढ झाली. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस पावसाने विश्रांती घेतली. त्या वेळी धरणात 92 टक्के पाणी साठा होता.

भाटघर धरणाची क्षमता 23 टीएमसी आहे. एकूण 81 दरवाजे असून, 45 स्वयंचलित, 36 अस्वयंचलित आहेत. स्वयंचलित दरवाजातून 1400 क्युसेकने विसर्ग सुरू आहे. शंभर टक्के धरण भरल्याने वेळवंडी नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, हिर्डोशी खोऱ्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. निरा-देवघर धरण 98 टक्के भरले आहे. हे धरणही दोन दिवसात 100 टक्के भरण्याची शक्यता आहे.

घाटमाथ्यासह धरणक्षेत्रात पावसाचे प्रमाण अधिक आहे, त्यामुळे ओढे, नाल्यांतून पाण्याची आवक वाढली आहे. गेल्या 24 तासांत खडकवासला धरणसाखळीत 0.27 टीएमसी पाण्याची वाढ झाली आहे. शनिवारी (दि. 16) सायंकाळी 5 वाजता धरणसाखळीत 25.87 टीएमसी पाणी होते. गेल्या 3 दिवसांपासून रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यासह पानशेत, वरसगाव, टेमघर, खडकवासला धरण क्षेत्रात रिमझिम सुरू आहे. अधूनमधून सरी पडत आहेत.

वरसगाव धरण विभागाच्या शाखा अभियंता प्रतीक्षा रावण म्हणाल्या, धरण माथ्यापेक्षा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण अधिक आहे. जोरदार पाऊस पडत नाही, मात्र रिमझिम सुरू असल्याने धरण साठ्यात हळूहळू पाण्याची भर पडत आहे.

सकाळपासूनच पानशेत, वरसगाव, टेमघर धरण खोऱ्यात रिमझिम होती. दुपारी 2 वाजल्यानंतर पावसाचे प्रमाण कमी झाले. मात्र, तुरळक रिमझिम सुरू आहे. खडकवासला पाणलोट क्षेत्रातील सिंहगड, मांडवी, मालखेड, खानापूर परिसरात हलका पाऊस झाला. तसेच अधूनमधून सरीदेखील पडत आहेत. दिवसभरात पानशेत येथे 8 मिलिमीटर, वरसगाव येथे 9 मिलिमीटर, टेमघर येथे 6 मिलिमीटर, तर खडकवासला येथे 1 मिलिमीटर पाऊस पडला.



### खडकवासला साखळी 90 टक्क्यांवर

» पानशेत आणि वरसगाव धरणक्षेत्रातील रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यासह पावसाच्या रिमझिमीमुळे रविवारी (दि. 17) खडकवासला धरणसाखळीतील पाणीसाठा जवळपास 90 टक्क्यांवर पोहचला. सायंकाळी 5 वाजता धरणसाखळीत 26.14 टीएमसी म्हणजे 89.67 टक्के पाणीसाठा झाला होता.